भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# –: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :–

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक २३.११.२०१९ ते २७.११.२०१९)

| अंक ९४/२०१९ | दिनांक २२.११.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१६/११/२०१९ ते २२/११/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता २३/११/२०१९ ते २७/११/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६/११ | १७/११ | १८/११ | १९/११ | २०/११ | २१/११ | २२/११ | दिनांक | २३/११ | २४/११ | २५/११ | २६/११ | २७/११ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३५.० | ३६.० | ३६.० | ३५.० | ३७.० | ३५.० | ३४.० | कमाल तापमान (अं. से) | ३५ | ३५ | ३६ | ३६ | ३५ |
| २२.५ | २२.५ | २२.५ | २१.० | २१.० | २२.० | २२.० | किमान तापमान (अं. से) | २० | १९ | २० | २१ | २१ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | सकाळ — मेघाच्छादन (ऑक्टा.) | १ | २ | १ | १ | १ |
| ढगाळ | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | दुपार — मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ८७ | ८७ | ९१ | ८९ | ९२ | ८८ | ९५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७५ | ६९ | ७० | ७१ | ७३ |
| ५५ | ४७ | ४६ | ४३ | ५३ | ६१ | ४६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४८ | ४३ | ४३ | ४४ | ४२ |
| ०.३ | ०.९ | ०.७ | १.३ | ०.९ | ०.४ | १.६ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००८ | ००८ | ००८ | ००९ | ०१० |
| स्थिर | स्थिर | पश्चिम | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ — वा-याची दिशा | पुर्वे कडून | पुर्वे कडून | पुर्वे कडून | पुर्वे कडून | पुर्वे कडून |
| ईशान्य | ईशान्य | ईशान्य | स्थिर | स्थिर | पुर्वे | पुर्वे | दुपार — वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ४५९१.० | ४५९१.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्ह्यात हवामान कोरडे राहून वातावरण अंशतः ढगाळ किंवा निरभ्र राहण्याची शक्यता आहे.

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| वायंगणी भात | रब्बी पेरणी | रब्बी हंगावातील भात लागवडीच्या पूर्व तयारीस सुरुवात करावी. उन्हाळी भात पीकासाठी १ हेक्टर क्षेत्र लागवडीसाठी १० गुंठे क्षेत्रात गादीवाफे तयार करुन घ्यावेत. जमिनीचा उतार लक्षात घेऊन निच-याच्या जागी तळाशी १२० सेमी आणि पृष्ठभागाशी ९० सेमी रुंदीचे ८ ते १० सेमी उंचीचे योग्य त्या लांबीचे गादी वाफे तयार करावेत. वाफ्यात प्रती गुंठा क्षेत्रास १ किलो युरिया व १.५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट द्यावे. बियाण्यास ३% मिठाच्या द्रावणाची (३०० ग्रम मीठ/१० लि. पाणी) प्रक्रिया करावी. वाफ्यावर ५ ते ८ से.मी. अंतरावर ओळीमध्ये १ ते २ सेमी खोलीवर बी पेरुन घ्यावे. जाड दाण्यांच्या जातीसाठी ५० किलो तर बारीक दाण्यांच्या जातीसाठी ४० लो;प बियाणे वापरावे. वायंगणी भात पीकाची पेरणी सुधारीत बियाण्यांचा वापर करुन करावी. |
| भुईमुग, सुर्यफुल व मोहोरी | रब्बी पेरणी | रब्बी उन्हाळी भुईमुग लागवडीसाठी शेताच्या पुर्वतयारीची कामे हाती घ्यावी. जमिन खोल नांगरुन, ढेकळे फोडुन व हेक्टरी १० ते १५ टन चांगले कुजलेले शेणखत/कंपोस्ट मिसळुन तयार करावी. पेरणीसाठी टी.जी.२६, टी.ए.जी.२४, टी.पी.जी.४१, कोकण गौरव, कोकण टपोरा या जातींचे बियाणे हेक्टरी १२५ ते १५० किलो या प्रमाणात वापरावे.<br>रबी सुर्यफुल लागवडीसाठी जमिन उभी-आडवी खोल नांगरुन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीपुर्वी हेक्टर १० ते टन चांगले कुजलेले शेणखत/कंपोस्ट जमिनीवर पसरुन मातीत मिसळावे. पेरणीसाठी. पेरणीसाठी सुर्यफुलाच्या मॉर्डन, एस.एस.५६, बी.एस.एच-१ इ. सुधारीत जातींचा वापर करावा. हेक्टरी १० ते १२ किलो बियाणे वापरावे. पेरणीपुर्वी बियाणे १२ तास पाण्यात भिजवुन नंतर सावलीत वाळवावे. तसेच प्रती किलो २ ग्रम या प्रमाणात बुरशीनाशक चोळावे.<br>मोहरी पिकाच्या पेरणीसाठी हवामान योग्य असल्याने पुसा बोल्ड किंवा वरुणा या जातीची लागवड करावी. पिकाची पेरणी ४५ x १० से.मी अंतरावर ३ ते ४ से.मी. खोल करावी. पेरणीपुर्वी प्रती गुंठ्यास १ किलो युरिया आणि ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट ओळीत पेरुन द्यावे. |
| कुळीथ व चवळी | पेरणी | लांबलेल्या मान्सुनोत्तर पाऊसामुळे भात पिकाची काढणी झालेल्या ठिकाणी रब्बी पिकांच्या पेरणीपुर्व तयारीची कामे हाती घेण्यात यावीत. कुळीथाची व रब्बी हंगामातील चवळी पिकाची पेरणी १५ ऑक्टोबर ते नोव्हेंबर अखेर पर्यंत करावी.<br>पेरणीसाठी दापोली - १ व कोकण सदाबहार, कोकण सफेद या अनुक्रमे कुळीथ व चवळी या पिकाच्या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>कुळीथ व चवळी पिकाची पेरणी ३०x१५ सेमी या अंतरावर करावी. साधारणतः कुळीथासाठी प्रती हेक्टरी १८ ते २० किलो व चवळीसाठी प्रती हेक्टरी १५ ते १८ किलो बियाणे पुरते, बियाण्यास प्रती किलोस २.५ ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. कुळीथासाठी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ६० किलो पालाश व चवळीसाठी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत सरीमध्ये बुजवुन द्यावी. |
| कडवा वाल | पेरणी | पिकाची पेरणी ऑक्टोबर व नोव्हेंबर मध्ये ३०x१५ सेमी किंवा ३०x२० सेमी किंवा ३०x३० सेमी या अंतरावर नांगरा पाठोपाठ करावी.<br>पेरणीसाठी पिकाच्या कोकण वाल -१ व कोकण वाल -२ या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>पाभरीणे पेरणी केल्यास साधारणतः प्रती हेक्टरी ५० ते ६० किलो बियाणे पुरते. बियाण्यास प्रती किलोस ३.० ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी.<br>पिकास ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत बियाण्याखाली साधारण ५ सेमी खोलीवर द्यावी. |
| आंबा | पालवी | अनियमित पावसामुळे आंबा पालवीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी आवश्यकतेनुसार १% कार्बेन्डाझीम (१० ग्रॅम १० लिटर पाण्यात) या बुरशिनाशकाची फवारणी घ्यावी.<br>लांबलेल्या मान्सुनोत्तर पाऊसामुळे आंबा पालवीवर तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणारी अळी आणि मिजमाशीपासून आवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी २५% प्रवाही डायमिथोएट किंवा ३६% प्रवाही मोनोक्रोटोफॉस ११ मिलि प्रति १० लि पाण्यात मिसळुन फवारणी करावी. |
| काजु | फुलोरा | काजु बागायतदारांनी ढेकण्या किडीच्या प्रादुर्भाव होवु नये म्हणुन जागरुक रहावे, प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही मोनोक्रोटोफॉस ३६% १५ मि.ली. किंवा लम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ६ मि.ली. १० लिटर पाण्यातुन फवारावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|